महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. ३७४(२)/स्थापत्य/२०१९/१९ दिनांक - १० जून, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ सुधारित निकालाबाबत.

संदर्भ :- आयोगाची क्रमांक डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक १२ व १५ फेब्रुवारी २०२२ तसेच क्रमांक ३७४(२)/स्थापत्य/२०१९/१९ दिनांक १६ मार्च २०२२ व १३ एप्रिल २०२२ ची प्रसिध्दीपत्रके.

आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक १३ एप्रिल २०२२ च्या प्रसिध्दीपत्रकानुसार महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ चा अंतिम निकाल दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकाल प्रसिध्द झाल्यानंतर भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प (Opting Out) सादर करणाऱ्या उमेदवारांचा शिफारशीसाठी विचार करण्यात आल्यामुळे काही पात्र उमेदवारांची शिफारस होऊ शकली नाही, अशा आशयाची निवेदने आयोगास प्राप्त झाली होती. सदर अभिवेदनांची तपासणी केली असता, आयोगाच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार दिनांक १२ ते १५ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प / पसंतीक्रम सादर केलेल्या काही उमेदवारांनी आयोगाच्या दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी सुधारीत कार्यपध्दतीनुसार उचित कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे अंतिम निकाल तयार करताना अशा उमेदवारांचे भरती प्रकियेतून बाहेर पडण्याचे विकल्प / पसंतीक्रम विचारात न घेता, सदर परीक्षेच्या परीक्षा योजनेतील तरतुदी नुसार याबाबत कार्यवाही अनुसरण्यात आली होती. मात्र उमेदवारांकडून प्राप्त निवेदनांच्या पार्श्वभूमीवर तसेच उमेदवारांचे नुकसान होऊ नये, याबाबींचा साकल्याने विचार करुन दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ ते १५ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीमध्ये भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प / पसंतीक्रम सादर करणाऱ्या उमेदवारांचे विकल्प / पसंतीक्रम लक्षात घेऊन विषयांकित परीक्षेचा निकाल सुधारीत करण्यात आला असून सदर निकाल आयोगांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

२. सुधारित अंतिम निकालानुसारही एकूण ११४५ उमेदवारांपैकी अनाथांसाठी आरक्षित असलेल्या दोन पदांपैकी एक पद तसेच दिव्यांग श्रवण शक्तीतील दोष या प्रवर्गाकरीता आरक्षित असलेले एक पद पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त ठेवण्यात आले आहे.

३. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाच्या संबंधित विभागांकडे करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासताना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल झालेल्या मुळ अर्ज क्र. ३००/२०२२ तसेच मुळ अर्ज क्र. २८०/२०२२ प्रकरणी झालेले अंतरिम आदेश विचारात घेऊन व मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये विविध मुद्यांबाबत दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

ठिकाण- मुंबई

उपसचिव परीक्षोत्तर (राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई